आमदार
विधानपरिषद सदस्य

सत्यमेव जयते

हरिभाऊ राठोड
आमदार (MLC)
माजी खासदार
लोक सभा
मोबाईल: ९९२०७१६९९९
टेली फॅक्स: ०२२ २५६८६६९९

# बढती मधील आरक्षण प्रकरण; सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाची अक्षम्य चूक, अर्थाचे अनर्थ..

बढती मधील आरक्षणाच्या संदर्भात, सर्वोच्च न्यायालयामध्ये घटनापिठा पुढे गेल्या आठवड्या पासून, महासुनावणी रंगली असून, पुढील आठवड्यात दि.२९ आणि ३० ऑगस्ट रोजी, पुढील सुनावणी, मुख्य न्यायधीषासह पाच न्यायधीषाच्या खंडपीठा पुढे चालू आहे. प्रश्न असा उपस्थित झाला आहे की, एम.नागराज प्रकरणी दिलेल्या पाच न्यायधीषाच्या खंडपीठाने बढती मधील आरक्षण देतांना, तीन अटींच्या पुर्ततेचे सूतोवाच करतांना असे म्हटले होते की, (१) मागासलेपणा (२) योग्य प्रतिनिधित्व (३) प्रशासकीय कार्यक्षमतेवर बाधा न येणे, या तीन अडथळयाच्या शर्यती लावल्या मुळे अनेक उच्च न्यायालयाने मागासवर्गीयांच्या बढती मधील आरक्षणाला स्थगिती दिली, आणि गोंधळाची स्थिती निर्माण केली आहे.

## केंद्राचे आदेश, राज्य सरकार टाळाटाळ का करीत आहे ?

या दरम्यान ६ जून २०१८ रोजी सर्वोच्च न्यायालयांनी एका प्रकरणामध्ये दोन न्यायधीषाच्या पीठाने असा निर्णय दिला की, मागासलेपणा, योग्य प्रतिनिधित्व आणि प्रशासकीय कार्यक्षमता या संदर्भात सात न्यायधीशाच्या खंडपीठा पुढे, सुनावणी करून योग्य तो निर्णय घेण्यात यावा, आणि तो पर्यंत प्रचलित कायद्यानुसार बढती मधील आरक्षण चालू ठेवावे, या निकालाच्या आधारावर केंद्र सरकारने, कॅबिनेट मध्ये हा प्रस्ताव पारित करून घेतला आणि केंद्रीय मंत्री रामविलास पासवान यांनी पत्रकार परिषदेत हा निर्णय जाहीर केला की, या पुढे बढती मधील आरक्षण, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन राहून सर्वत्र चालू राहील. डी.ओ.पी.टी ने तशा प्रकारचे जी.आर जारी करून सर्व राज्य सरकारच्या मुख्य सचिवांना या निर्णयाची तातडीने अंबलबजावणी करावी असे निर्देश दिले, या निर्देशाचे पालन खऱ्या अर्थाने बिहार सरकारने केले, परंतु भाजपचे सरकार असणाऱ्या प्रमुख महाराष्ट्र, मध्य प्रदेश आणि उत्तर प्रदेश सरकार मात्र अक्षम्य टाळाटाळ करीत आहे.

दि.२३ ऑगस्ट रोजी पाच न्यायधीषाच्या खंडपीठा पुढे सर्वोच्च न्यायालयात सुनावणी दरम्यान, अटर्नि जनरल ऑफ इंडिया के.के. वेणूगोपाल यांनी असा मुद्दा मांडला की,मागासवर्गीयांच्या बाबतीत, एकदा राष्ट्रपतीने जाहीर केलेल्या मागासवर्गीय घटकाला परत मागासलेपणा सिद्ध करण्याची गरज नाही, तर वरिष्ठ वकील शशी भूषण आणि राजीव धवन यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, एकदा मागासलेपणाच्या आधारावर आरक्षण मिळाल्यानंतर तो मागासलेला राहत नाही, या प्रकरणी पुढील सुनावणी पुढच्या आठवड्यात दि २९ व ३० ऑगस्ट रोजी होईल, असे जरी असले तरी एम.नागराज प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाचे खंडपीठ पूर्णपणे गोंधळलेले असून, मागासलेपणा, योग्य प्रतिनिधींत्व व कार्यक्षमता या तिन्ही बाबी चुकीच्या पध्दतीने सर्वोच्च न्यायालयामध्ये चर्चिले जात आहे म्हणून हा लेख प्रपंच..



E-mail : haribhaurathod@gmail.com • Website: www.haribhaurathod.com

मुंबई : ए-२०१, बंजारा हिल, बाबासाहेब नाईक सोसायटी, अशोक नगर पोलीस स्टेशन जवळ, मुलुंड (पै), मुंबई-८० टेली- 25686699 मोबाईल : 09868180458, 09920716999
यवतमाळ : अश्विनी टॉवर, डरवाहा रोड, यवतमाळ, महाराष्ट्र - ४४५००१. टेली - 07232-256333, 256010

आमदार
विधानपरिषद सदस्य

सत्यमेव जयते

हरिभाऊ राठोड
आमदार (MLC)
माजी खासदार
लोक सभा
मोबाईल: ९९२०७१६९९९
टेली फॅक्स: ०२२ २५६८६६९९

**विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे, गेल्या आठवड्यात सर्वोच्च न्यायालयामध्ये सुनावणी चालू असताना, माझ्या उजव्या बाजूला एम.नागराज तर डाव्या बाजूला, विजय घोगरे बसले होते, त्या दोघांशीही ओळख झाल्यावर, एम.नागराजनी गमतीने विचारले की, आपला मुद्दा काय ? तेव्हा ते म्हणाले, एकदा कर्मचारी किंवा अधिकारी नोकरीमध्ये आल्यावर तो मागासलेला राहत नाही, आणि तो आर्थिक दृष्ट्या सक्षम बनतो, मी त्यांना सांगितले की,जर नोकरी मधला बॅंकलॉग भरावयाचा झाल्यास तो कसा भरता येईल ? त्यावर ते मात्र अनुत्तरीत राहिले. विजय घोगरेशी बोलतांना मी त्यांना सांगितले कि, तुम्ही उगीच आपली कुऱ्हाड आपल्या पायावर पाडून घेतली आहे, मराठा आरक्षणाच्या संदर्भात मागासलेपणा आणि योग्य प्रतिनिधित्व, ह्या दोन बाबी आता आरक्षणातील अडथळे ठरले आहेत, मी त्यांना पुढे सांगितले की, आम्ही आता ओबीसींनाही बढती मध्ये आरक्षण दया, अशी मागणी सरकार कडे करतो आहे, मराठा समाजाला जेव्हा आरक्षण मिळेल, तेव्हा बढती मध्ये सुद्धा, आरक्षणाची मागणी निश्चितच जोर पकडेल, हे ऐकून त्यांनी गालाच्या गालात हसून, साहेब आपले म्हणणे योग्य आहे, अशी कबूली दिली.**

## खंडपिठाच्या एम.नागराज प्रकरणी, एका चुकी मुळे अनेक चुका

**" एम.नागराजन प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने आपले निष्कर्ष काढतांना, काय म्हटले आहे ते बघणे आवश्यक आहे. निष्कर्षात म्हटले आहे की, "ज्या संदर्भीय घटना दुरुस्तीद्वारा घटनेमध्ये कलम १६(४अ) व १६(४ब) घातले गेले आहेत, ती घटना दुरुस्ती घटनेच्या कलम १६ (४) मधूनच उत्पन्न झाली आहे. घटनेच्या कलम ३३५ या अंतर्गत राज्य शासनाची कार्यक्षमता ध्यानात घेऊन राज्य शासनाला ज्या घटकामुळे आरक्षणाची तरतूद करता येते, ते घटक किंवा कारणे या घटना दुरुस्ती मुळे, कायम राहते. कारणे किंवा घटक म्हणजे मागासलेपणा व पुरेसे प्रतिनिधित्व नसणे. ज्या संदर्भित घटना दुरुस्तीद्वारा घटनेत सदर १६(४ अ) व १६(४ ब) घातले गेलेत आहेत, ती घटना दुरुस्ती, घटनेच्या कलम १६(४) ची संरचना बदलत नाही. सदर संदर्भित घटना दुरुस्त्या फक्त अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती पुरत्याच मर्यादित आहेत. त्यामुळे घटनेची कोणतेही प्रावधाने नाश पावत नाहीत. किंवा लोप पावत नाहीत ".**

आता प्रश्न असा आहे की, जी चूक एम.नागराज प्रकरणी न्यायालयाने केली, आणि त्या चुकीच्या आधारावर अनेक उच्च न्यायालयांनी चुका केल्या, आणि मागासवर्गीयांना पदावन्नत केल्या गेले, आणि समाजामध्ये अपमानित केल्या गेले, आणि राजकीय स्तरावर याचा ठपका भाजप सरकारवर बसला, त्या बाबतही सुनावणी दरम्यान चर्चा व्हावी.



E-mail : haribhaurathod@gmail.com • Website: www.haribhaurathod.com

मुंबई : ए-२०१, बंजारा हिल, बाबासाहेब नाईक सोसायटी, अशोक नगर पोलीस स्टेशन जवळ, मुलुंड (वे), मुंबई-८० टेली- 25686699 मोबाईल : 09868180458, 09920716999
यवतमाळ : अश्विनी टॉवर, डरवाहा रोड, यवतमाळ, महाराष्ट्र - ४४०००१ . टेली - 07232-256333, 256010

आमदार
विधानपरिषद सदस्य

सत्यमेव जयते

हरिभाऊ राठोड
आमदार (MLC)
माजी खासदार
लोक सभा
मोबाईल: ९९२०७१६९९९
टेली फॅक्स: ०२२ २५६८६६९९

अत्यंत महत्त्वाचे असे की, मागासलेपणा किंवा योग्य प्रतिनिधित्व ह्या दोन्ही बाबी एखाद्या मागास घटकाला, किंवा जातीला आरक्षण देतांनाच बघायचे असतात, एकदा आरक्षण दिल्यावर परत परत मागासलेपणा कसा तपासात येईल ? दुसरे असे की, कार्यक्षमता हे बढतीच्या वेळेस बघायची असते, आणि ती मागासवर्गीया बरोबर, खुल्या वर्गातील कर्मचाऱ्यांची व अधिकाऱ्यांचीही तपासली जाते. अर्थातच त्या साठी मुल्यांकन आणि गोपनीय सेवा पुस्तक बघितला जातो, आणि त्या वरूनच त्या कर्मचाऱ्यांची बढती साठी योग्यता तपासली जाते, हे काम प्रत्येक आस्थापने मध्ये होतच असते.

## सर्वोच्च न्यायालय गोंधळले

सचिव पदावर पोहचलेल्या व्यक्तींच्या कुटुंबियांना आरक्षण असावे काय, असा प्रश्न सुनावणी दरम्यान उपस्थित करून,खरे म्हणजे बढती मधील आरक्षण हे त्या त्या प्रवर्गाचे बॅकलॉग भरण्यासाठी आहे. सुनावणी दरम्यान सर्वोच्च न्यायालयाने ५० वर्षापेक्षा जास्त वेळ लोटला तरी, आरक्षण असावे काय, असा प्रश्न उपस्थित केला, या प्रश्नास एकच उत्तर आहे की आरक्षण लागू करून, ७० वर्षाचा काळ लोटला आणि तरीही देशात २२.५% आरक्षण असतांना केवळ १२% आरक्षित पदे भरल्या गेलेली आहे, याचाच अर्थ असा की, सरकारी नोकरी मधील बराच बॅकलॉग अजूनही शिल्लक आहे, सरकारी नोकरी मधील बॅकलॉग दोन पद्धतीने भरता येते, एक तर सरळ सेवा पद्धतीने, किंवा बढती मध्ये आरक्षण देऊन, त्यामुळे बढती मधील आरक्षण हे त्या व्यक्तीसाठी नसून, त्या समाजास प्रतिनिधित्व देण्यासाठी आहे, हे सर्वोच्च न्यायालयाने समजून घेतले पाहिजे.

अत्यंत उल्लेखनीय बाब म्हणजे, सुनावणी दरम्यान जेष्ठ वकील इंदिरा जयसिंग यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, घटनेचे १६(४) हे कलम इतर मागासवर्गीयांनसाठी आहे, आणि त्यासाठी राज्यसरकारांना अधिकार दिलेले आहे, आणि मागासलेपणा आणि योग्य प्रतिनिधित्व, एखाद्या मागास घटकाला आरक्षणाचे तत्व लागू करण्यासाठी आहे, दुसरे उल्लेखनीय बाब म्हणजे, अँड राकेश राठोड यांनी असा मुद्दा उपस्थित केला की,एकदा अनुसूचित जाती आणि जमाती यांना राष्ट्रपती महोदयांच्या मान्यतेनी घटनेचे कलम ३४१ आणि ३४२ प्रमाणे मागासलेले जाहीर केल्या नंतर, परत त्यांचे मागासलेपणा सिद्ध करण्याची आवश्यकता नाही. या संदर्भात राज्य सभेने घटना दुरुस्ती बील क्र. ११७ मंजूर केले आहे. परंतु काही तांत्रिक कारणास्तव लोकसभेमध्ये हे अजून मंजूर होऊ शकले नाही.

वरील युक्तिवाद बघता असे वाटते की, न्यायालयाने आपल्या डोळ्यावरची आपली पट्टी हटवावी आणि सरकारनी आंधळे, बहिरे आणि मुक्याचे सोंग न घेता ताबडतोब सरकारी पदामधील बॅकलॉग भरावा, कारण बढती मधील आरक्षण, हे बॅकलॉग भरण्यासाठी असून, संविधानाच्या कलम १६ (४) अ आणि १६(४) ब प्रमाणे सरकारी सेवेमध्ये अनुसूचित जाती, जमातींना योग्य प्रतिनिधित्व देण्यासाठी आहे.



दि. २५/०८/२०१८

---- हरिभाऊ राठोड
विधानपरिषद सदस्य,

E-mail : haribhaurathod@gmail.com • Website: www.haribhaurathod.com

मुंबई : ए-२०१, बंजारा हिल, बाबासाहेब नाईक सोसायटी, अशोक नगर पोलीस स्टेशन जवळ, मुलुंड (वे), मुंबई-८० टेली- 25686699 मोबाईल : 09868180458, 09920716999
यवतमाळ : अश्विनी टॉवर, डरवाहा रोड, यवतमाळ, महाराष्ट्र - ४४०००१ . टेली - 07232-256333, 256010